पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल जि. रायगड – ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय ०२२ – २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२ – २७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com वेबसाईट : panvelcorporation.maharashtra.gov.in

जा.क्र.पमपा/पर्यावरण /३९२६/प्र.क्र.०८ / १५६ /२०२६ दिनांक :- २३ /११ /२०२६

जाहीर बाजारभाव दरपत्रके सूचना

पनवेल महानगरपालिकेमार्फत खालील बाबींकरीता बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

" पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्वच्छ भारत मिशन (SBM) व माझी वसुंधरा अभियानांतर्गत व्यापक IEC, BCC, जनजागृती, नागरिक सहभाग,क्षमता बांधणी उपक्रम राबविणेकरिता त्रयस्थ संस्था नेमणूक करणेबाबत ". याकामाकरिता आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडून जाहीर सूचनेद्वारे बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत .

कामाचे नाव :- "पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्वच्छ भारत मिशन (SBM) व माझी वसुंधरा अभियानांतर्गत व्यापक IEC, BCC, जनजागृती, नागरिक सहभाग ,क्षमता बांधणी उपक्रम राबविणेकरिता त्रयस्थ संस्था नेमणूक करणेबाबत ".

प्रस्तावित कामाचा कालावधी :- कार्यादेश दिल्यापासून ०१ वर्ष.

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
१	Awareness Workshop - School, College, Market Area, Govt. off.	1. निविदाधारकाने पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिक, विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत नागरिक सहभाग यांचा सुनिश्चित करणे. 2. कार्यक्रमांसाठी आवश्यक ध्वनिक्षेपक यंत्रणा (Sound System), बॅनर, स्टँडी, जनजागृती साहित्य व प्रात्यक्षिकासाठी आवश्यक साहित्याची व्यवस्था निविदाधारकाने करावी. 3. कार्यक्रमांच्या नियोजन व प्रभावी अंमलबजावणीसाठी निविदाधारकाने शाळा, महाविद्यालये, महानगरपालिका अधिकारी, NSS, NCC, महिला बचत गट (SHG), स्वयंसेवी संस्था (NGO) व इतर संबंधित संस्थांशी पूर्वसमन्वय साधावा. 4. आयोजित कार्यक्रम, प्रशिक्षित नागरिक, विद्यार्थी व अधिकारी यांची माहिती, सहभागी संख्या, छायाचित्रे व	Event	१	Per Event	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
		उपक्रमांचा तपशील यांचा मासिक अहवाल तयार करून Google Drive वर अद्ययावत ठेवावा व त्याची लिंक नियमितपणे महानगरपालिकेला सादर करावी.				
२	Traditional Tutari Dawandi Awareness	1. निविदाधारकाने दवंडी देणारे कलाकार, डफली वादक व तुतारी वादक यांच्या माध्यमातून स्वच्छ भारत मिशन (SBM) व माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्वच्छता, कचरा वर्गीकरण, पर्यावरण संवर्धन याबाबत पारंपरिक पद्धतीने जनजागृती मोहीम राबवावी. 2. सदर मोहिमेसाठी आवश्यक स्क्रिप्ट तयार करणे, कलाकारांची व्यवस्था, पोशाख, कार्यक्रमाचे नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल. 3. कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक ध्वनिक्षेपक यंत्रणा (Sound System), बॅनर, स्टँडी व इतर आवश्यक जनजागृती साहित्याची व्यवस्था निविदाधारकाने करावी.	Event	१	Per Event	
३	Swachh Pathnatya	1. निविदाधारकाने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निवडलेल्या ठिकाणी स्वच्छ भारत मिशन (SBM) व माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्वच्छता, कचरा वर्गीकरण, पर्यावरण संवर्धन याविषयी जनजागृती करण्यासाठी पथनाट्यांचे आयोजन व सादरीकरण करावे. 2. पथनाट्यासाठी आवश्यक स्क्रिप्ट तयार करणे, कलाकारांची व्यवस्था, पोशाख, कार्यक्रमाचे नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल. 3. कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक ध्वनिक्षेपक यंत्रणा (Sound System), बॅनर, स्टँडी व इतर आवश्यक जनजागृती साहित्याची व्यवस्था निविदाधारकाने करावी.	Event	१	Per Event	
४	Swachhata Karmchari Sanman	1. निविदाधारकाने संबंधित विभाग व अधिकाऱ्यांशी समन्वय साधून स्वच्छता सर्वेक्षणातील कामगिरी व कार्याच्या आधारे स्वच्छता कर्मचाऱ्यांची सन्मान समारंभासाठी निवड करावी. 2. सन्मान समारंभाची वेळ व ठिकाण महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांशी चर्चा करून निश्चित करावे. कार्यक्रमासाठी आवश्यक स्थळाची उपलब्धता महानगरपालिकेमार्फत करून	Event	१	Per Event	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
		देण्यात येईल. 3. समारंभासाठी प्रमुख पाहुणे, महानगरपालिका अधिकारी, पदाधिकारी, नगरसेवक, ज्येष्ठ नागरिक व इतर संबंधित मान्यवरांना पूर्वसूचना देऊन निमंत्रित करण्याची व्यवस्था करावी. 4. निवड झालेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान प्रमाणपत्र, त्यांच्या कार्याची माहिती व तुळशीचे रोप देऊन करण्यात यावा. 5. संपूर्ण सन्मान समारंभाचे नियोजन व अंमलबजावणी, निवेदक व स्वयंसेवक टीमची व्यवस्था, सन्मानित कर्मचाऱ्यांचे व्हिडिओ बाईट, छायाचित्रण, जिओ-टॅग केलेली छायाचित्रे तसेच कार्यक्रमासाठी आवश्यक साहित्याची व्यवस्था व पूर्तता करण्याची जबाबदारी निविदाधारकाची असेल.				
५	Swachh Shapath Campaign	1. निविदाधारकाने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिक, विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी स्वच्छ भारत मिशन (SBM) व माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्वच्छता उपक्रम व नागरिकांच्या सक्रिय सहभागावर भर देण्यात यावा. 2. शपथेचा मजकूर स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन (SWM) विभागाच्या सल्ल्याने तयार करण्यात यावा. त्यामध्ये कचरा वर्गीकरण, प्लास्टिकचा वापर टाळणे, स्वच्छ हवा, जलसंवर्धन, ऊर्जा बचत, हरित पर्यावरण व नागरिकांची पर्यावरणाप्रती जबाबदारी या विषयांचा समावेश असावा. 3. कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक ध्वनिक्षेपक यंत्रणा (Sound System), बॅनर, स्टँडी व इतर आवश्यक जनजागृती साहित्याची व्यवस्था निविदाधारकाने करावी. 4. आयोजित कार्यक्रमांचे छायाचित्रण, महत्त्वाच्या क्षणांची नोंद व इतर आवश्यक माहिती संकलित करून Google Drive वर अपलोड करावी व त्याची लिंक व तपशीलवार अहवाल नियमितपणे महानगरपालिकेला सादर करावा.	Event	१	Per Event	
६	Swachhata - Cleaning Drives	1. निविदाधारकाने महानगरपालिका अधिकाऱ्यांशी समन्वय साधून महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम (Cleaning Drive) आयोजित करावी त्यामध्ये विविध स्वच्छता उपक्रमांचा	Event	१	Per Event	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
		समावेश असावा. 2. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था (NGO), विद्यार्थी, नागरिक व इतर संबंधित घटकांना स्वच्छता मोहिमेत सहभागी होण्यासाठी आवाहन करून त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा. 3. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत भाजी मंडई, तलाव व जलस्रोत परिसर, शासकीय/निमशासकीय व खासगी कार्यालये, शाळा, महाविद्यालये तसेच विविध रहिवासी संकुले अशा ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवावी. 4. स्वच्छता मोहिमेत सहभागी सदस्यांना आवश्यकतेनुसार हातमोजे (Hand Gloves) व मास्क उपलब्ध करून देण्याची जबाबदारी निविदाधारकाची असेल. 5. प्रत्येक स्वच्छता मोहिमेची जिओ-टॅग केलेली छायाचित्रे (Geo-tagged Photos), सहभागींची माहिती व उपक्रमाचा तपशील संकलित करून अहवाल महानगरपालिकेला सादर करणे बंधनकारक राहील. 6. कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक ध्वनिक्षेपक यंत्रणा (Sound System), बॅनर, स्टँडी व इतर आवश्यक जनजागृती साहित्याची व्यवस्था निविदाधारकाने करावी.				
७	Swachh Vidyalaya Drives	1. निविदाधारकाने महानगरपालिका शाळांमध्ये स्वच्छ भारत मिशन (SBM) व माझी वसुंधरा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी प्रेझेंटेशन, प्रत्यक्ष प्रात्यक्षिके (Demonstrations) व संवादात्मक सत्रे (Interactive Sessions) आयोजित करून स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करावी. 2. स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत विद्यार्थ्यांना स्त्रोत पातळीवरील कचरा वर्गीकरण, ३R (Reduce, Reuse, Recycle), प्लास्टिकचा वापर टाळणे, वृक्षसंवर्धन, स्वच्छ हवा, जलसंवर्धन व ऊर्जा बचत याबाबत मार्गदर्शन करावे. 3. महानगरपालिका शाळांशी समन्वय साधून देईल. शाळानिहाय वेळापत्रक तयार करणे, कार्यक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी करणे आणि उपक्रमांचा आवश्यक तपशील व छायाचित्रांसह अहवाल	Event	१	Per Event	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
		महानगरपालिकेला सादर करण्याची जबाबदारी निविदाधारकाची असेल.				
८	Zero-Waste Event	1. निविदाधारकाने महानगरपालिका क्षेत्रातील निवडलेल्या लग्न समारंभ, सामाजिक मेळावे, धार्मिक कार्यक्रम व इतर सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये "झिरो वेस्ट" (Zero Waste) उपक्रम राबवावा. कार्यक्रमस्थळी निर्माण होणारा कचरा योग्य प्रकारे वर्गीकृत करून त्याचे पुनर्वापर व शास्त्रोक्त व्यवस्थापन करावे आणि कोणताही कचरा परिसरात टाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. 2. स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत बँक्वेट हॉल, टेंट हाऊस, केटरिंग सेवा व कार्यक्रम आयोजक यांच्या समन्वयाने ३R (Reduce, Reuse, Recycle) संकल्पनेचा प्रचार व अंमलबजावणी करावी. यामध्ये पुनर्वापरयोग्य भांडी व कटलरीचा वापर, एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळणे, अन्नाची नासाडी कमी करणे, कचरा वर्गीकरण व पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करणे यांचा समावेश असावा. उपक्रमांतील सहभाग वाढविणे यावर भर द्यावा. 3. निविदाधारकाने आयोजित केलेल्या प्रत्येक झिरो वेस्ट कार्यक्रमाचे दस्तऐवजीकरण करावे. यामध्ये आयोजकाचे नाव व माहिती, कार्यक्रमाचे ठिकाण, कार्यक्रमाचा संक्षिप्त अहवाल, कचरा व्यवस्थापनाची माहिती, छायाचित्रे व इतर आवश्यक तपशीलांचा समावेश असावा. सदर माहिती Google Drive वर नियमितपणे अपलोड करून त्याची लिंक व अहवाल महानगरपालिकेला सादर करावा.	Event	१	Per Event	
९	Plastic Ban Awareness Campaign & Single Use Plastic	१.निविदाधारकाने स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्लास्टिक बंदी व सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत विशेष जनजागृती मोहीम राबवावी. बाजारपेठा, दुकाने व सार्वजनिक ठिकाणी नागरिक आणि व्यापाऱ्यांना प्लास्टिकच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन करून कापडी पिशव्या व इतर पर्यावरणपूरक पर्यायी वस्तूंच्या वापरास प्रोत्साहित करावे.	Event	१	Per Event	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
		3. स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत विद्यार्थी, नागरिक, व्यापारी, दुकानदार, फेरीवाले व इतर संबंधित घटकांसाठी त्यांच्या गरजेनुसार लक्ष्यित गटाधारित (Target Group Based) जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत. कार्यक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी व आवश्यक जनजागृती साहित्याची व्यवस्था निविदाधारकाने करावी. 4. कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक ध्वनिक्षेपक यंत्रणा (Sound System), बॅनर, स्टँडी व इतर आवश्यक जनजागृती साहित्याची व्यवस्था निविदाधारकाने करावी.				
१०	School/College Workshops & Quizzes	1. निविदाधारकाने स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील शाळा व महाविद्यालयांमध्ये स्वच्छता विषयक क्विझ स्पर्धा, चित्रकला व निबंध स्पर्धा, कार्यशाळा (Workshops), गट चर्चा तसेच इतर जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करावे. 2.संबंधित विभागाच्या समन्वयाने करावे. प्रत्येक स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रे व तत्काळ बक्षिसे प्रदान करण्यासाठी आवश्यक नियोजन व अंमलबजावणी निविदाधारकाने महानगरपालिकेच्या सहकार्यानेकरावी. 3. स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत स्पर्धा व उपक्रमांचा पूर्वप्रचार करण्यासाठी आवश्यक असलेले बॅनर डिझाईन, पत्रके (Leaflets), सोशल मीडिया पोस्ट व इतर डिजिटल जनजागृती साहित्य तयार करून महानगरपालिकेला सादर करण्याची जबाबदारी निविदाधारकाची असेल. प्रचार साहित्यामध्ये कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकचा वापर कमी करणे, जलसंवर्धन, वृक्ष व जैवविविधतेचे संरक्षण, ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैली या विषयांचा समावेश करावा. 4. आयोजित स्पर्धा व उपक्रमांचे छायाचित्रण करावे. स्पर्धेतील विजेत्यांची माहिती, महत्त्वाचे क्षण, छायाचित्रे, सहभागींचा तपशील व इतर आवश्यक माहिती Google Drive वर व्यवस्थित अपलोड करून त्याचा अहवाल महानगरपालिकेला सादर करावा.	Event	१	Per Event	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
११	Online Webinar for SBM Awareness	1.निविदा धारकाने Online webinar (Zoom/Google Meet) आयोजित करावे. 2.तज्ज्ञ वक्ते व presentation ची व्यवस्था निविदा धारकाने करावी. 3. Q&A session आयोजित करावे. 4.Webinar recording व रीपोर्ट पालिकेला सादर करणे बंधनकारक राहील .	Event	१	Per Event	
१२	Swachhata Daud - Swachh Marathon	1. निविदा धारकाने शहरस्तरीय (City Level) स्वच्छ मॅरेथॉन (Swachh Marathon) यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करावे . 2. उपक्रमांसाठी आवश्यक नागरिक व सहभागी स्पर्धक यांचा प्रतिसाद मिळावा यासाठी महानगरपालिकेला योग्य ते मार्गदर्शन करावे . 3. महानगरपालिकेला विविध प्रकरच्या बॅनर डिझाईन, पत्रके डिझाईन (leaflets), सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी डिझाईन इत्यादींचा पुरवठा करण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल. 4. कार्यक्रमासाठी सहभागी सदस्यांचा प्रतिसाद नोंदवावा. 5. महत्त्वाचे क्षण , छायाचित्रे व इतर आवश्यक माहितींसह सर्व तपशील Google Drive वर अपलोड करून महानगरपालिकेला सादर करावे .	Event	१	Per Event	
१३	२nd October Swachh programme	1. निविदा धारकाने महानगरपालिका कार्यक्षेत्रात निवडलेल्या ठिकाणी उपक्रमाचे आयोजन करावे . 2. महानगरपालिकेला विविध प्रकरच्या बॅनर डिझाईन, पत्रके डिझाईन (leaflets), सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी डिझाईन इत्यादींचा पुरवठा करण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल. 3.कार्यक्रमाच्या ठिकाणी sound system ,Banner ,standy ची व्यवस्था निविदा धारकाने करावी .	Event	१	Per Event	
१४	Swachh Iconic Programme - Swachh Sandhykal	1.निविदा धारकाने सांस्कृतिक व जनजागृती कार्यक्रम आयोजित करावे. 2. कलाकार, निवेदक आणि कार्यक्रमाचे आयोजन करण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल . 3.स्वच्छतेवरील संदेश देणारे कार्यक्रम सादर करावे. 4.कार्यक्रमाच्या ठिकाणी sound system ,Banner ,standy ची व्यवस्था निविदा धारकाने करावी . 5.कार्यक्रमासाठी मैदान / हॉल ची व्यवस्था	Event	१	Per Event	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
		महानगरपालीकेकढून करण्यात येईल.				
१५	Flashmob	1.निविदा धारकाने महानगरपालिका क्षेत्रातील गजबजलेल्या ठिकाणी किंवा मॉल मध्ये फ्लॅशमॉब चे आयोजन करावे. 2. उपक्रमासाठी लागणारे Choreographer,Dancer आणि इतर वॉलंटियर निविदा धारका , तसेच महानगरपालिकेला standee , बॅनर, Mic ,स्पीकर पुरविण्यात येईल.	IEC	१	Per Event	
१६	Event Rally (प्रभात फेरी) - Gudipadwa, १५ Aug, २६ Jan, १ May, Diwali	1.निविदा धारकाने महानगरपालिका कार्यक्षेत्रात निवडलेल्या ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करावे . 2. या दिवशी लागणारे मनुष्यबळ, बॅनर, ट्रक, ट्रक सजावट, ट्रकवरील कार्यक्रमांचे आयोजन निविदाधारकाने करावे . 3. घोषवाक्ये, परवानग्या आणि संपूर्ण रॅलीचे नियोजन व व्यवस्थापन यासाठी महानगरपालिकेसोबत समन्वय साधावे. 4. geo tagged फोटो घेणे व त्याचा रीपोर्ट पालिकेला सादर करणे बंधनकारक राहील.	Event	१	Per Event	
१७	Swachh Bharat Diwas, World Toilet Day, Global Handwashing Day	1. निविदा धारकाने स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत विशेष दिवसांनिमित्त जनजागृती कार्यक्रम आयोजित करावे . 2.कार्यक्रमाच्या ठिकाणी sound system ,Banner ,standy ची व्यवस्था निविदा धारकाने करावी . 3. नागरिकांचा सहभाग वाढवण्या साठी स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत महानगरपालिकेला विविध प्रकरच्या बॅनर डिझाईन, पत्रके डिझाईन (leaflets), सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी डिझाईन इत्यादींचा पुरवठा करण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल.	Event	१	Per Event	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
१८	Plog Run	1.निविदा धारकाने प्लॉग रन (धावणे + कचरा संकलन) उपक्रमाचे आयोजन करावे. 2. सहभागींची नोंदणी, सुरक्षा उपाययोजना, कचरा संकलन साहित्य, आणि मार्ग नियोजन करण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल. 3. स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत महानगरपालिकेला विविध प्रकरच्या बॅनर डिझाईन, पत्रके डिझाईन (leaflets), सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी डिझाईन इत्यादींचा पुरवठा करण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल. 4. कार्यक्रमासाठी सहभागी सदस्यांचा प्रतिसाद नोंदवावा. 5. महत्त्वाचे क्षण , छायाचित्रे व इतर आवश्यक माहितींसह सर्व तपशील Google Drive वर अपलोड करून महापालिकेला सादर करावे .	Event	१	Per Event	
१९	Chaar Bin Apnao, Prakriti Bachao Drive	1.निविदा धारकाने चार डब्बा (segregation) संकल्पना विचारात घेऊन उपक्रम आयोजित करावे. 2.Door-to-door Demonstration व training द्यावी व IEC material वाटप करावे 3.नागरिकांना योग्य कचरा वर्गीकरण शिकवावा. 4.उपक्रम राबविताना बॅनर, स्टँडी इत्यादी योग्य प्रचार साहित्याचा वापर करावा . 5.उपक्रमाचा अहवाल Google Drive वर अपडेट करून त्याची लिंक नियमितपणे महानगरपालिके कडे सादर करावी	Event	१	Per Event	
२०	३R Exhibitions	1 .निविदा धारकाने Reduce, Reuse, Recycle exhibition आयोजित करावे. 2.IEC सामग्री तयार करावी व नागरिकांना practical demonstration द्यावे. 3.स्टॉल्स, सहभागींशी समन्वय ,संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन निविदा धारकाने करावे. 4.कार्यक्रमासाठी हॉल ची व्यवस्था महानगरपालिकेकडून करण्यात येईल.	Event	१	Per Event	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
२१	Cycle Rally - Cyclothon	1.निविदा धारकाने स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत सायकल रॅलीचे आयोजन करून स्वच्छता संदेश प्रसारित करावे . 2. सहभागींची नोंदणी, सुरक्षा उपाययोजना, कचरा संकलन साहित्य, आणि मार्ग नियोजन करण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल. 3 . स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत महानगरपालिकेला विविध प्रकरच्या बॅनर डिझाईन, पत्रके डिझाईन (leaflets), सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी डिझाईन इत्यादींचा पुरवठा करण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल. 4 . कार्यक्रमासाठी सहभागी सदस्यांचा प्रतिसाद नोंदवावा. 5 . महत्त्वाचे क्षण , छायाचित्रे व इतर आवश्यक माहितींसह सर्व तपशील Google Drive वर अपलोड करून महानगरपालिकेला सादर करावे .	Event	१	Per Event	
२२	Canter Van	1 .निविदा धारकाने Mobile प्रचार वाहनाद्वारे जनजागृती करावी. 2. Canter Van मध्ये लावण्यात येणाऱ्या Video , Audio महानगरपालीका सामंधित अधिकारी यांच्याकढून Approove करून घ्याव्यात. 3. महत्त्वाचे क्षण , छायाचित्रे व इतर आवश्यक माहितींसह सर्व तपशील Google Drive वर अपलोड करून महानगरपालिकेला सादर करावे .	IEC	१	Per day	
२३	Swachh Competition - Drawing, Wall painting, Jingle making, Short Film Competition, Reel Competition, पोवाडा स्पर्धा	1. स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत निविदा धारकाने विविध स्पर्धा आयोजित कराव्यात. 2.Registration व participant management निविदा धारकाने करावयाच्या आहेत. 3.Judges panel तयार करावे 4.Prize, certificates व्यवस्था निविदा धारकाने करावयाची आहे	IEC	१	Per Competition	
२४	Song / Jingle	1.निविदा धारकाने स्वच्छता जनजागृतीसाठी आकर्षक गाणे किंवा जिंगल तयार करावे . 2. स्क्रिप्ट, रेकॉर्डिंग, म्युझिक कंपोझिशन आणि प्रसारण याची जबाबदारी निविदा धारकाची असेल.	IEC	१	Per Song	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
२५	Swachh Public Byte	नागरिक, अधिकारी किंवा मान्यवरांचे स्वच्छतेविषयी छोटे व्हिडिओ बाइट्स तयार करणे. शूटिंग, एडिटिंग व प्रसारण करणे.	Social Media	१	Per Byte	
२६	Documentaries (Single)	1.निविदा धारकाने Artist ,videographer, फोटोग्राफर, स्क्रिप्ट रायटर, वॉइस ओव्हर आर्टिस्ट, पोस्ट प्रॉडक्शन, एडिटर या सर्वांचे नियोजन करावे . 2.महानगरपालिकेकढून स्वछ सर्वेक्षण अंतर्गत केलेल्या कामाचे जुने फुटेजेस माहिती संबंधित विभागाकडून पुरविण्यात येईल . 3. डॉक्युमेंटरी साधारण 10-15 मिनिटांची असावी .	Social Media	१	Per Docum entary	
२७	Influential Public Bytes	1.निविदा धारकाने पालिका क्षेत्रातील नामांकित आणि प्रसिद्ध व्यक्तीकडून व्हिडियो बाईट घ्याव्यात . 2.त्यासाठी आवश्यक निवेदक आणि समन्वयाचे काम केले जाईल. या व्यक्तींची नावे संबंधित अधिकारींशी चर्चा करून ठरविण्यात येईल तसेच यांची वेळ घेणीसाठी पालिकेकडून आवश्यक मदत करण्यात येईल.	Social Media	१	Per Byte	
२८	Reels / Shorts	1.निविदा धारकाने स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत सोशल मीडियासाठी लघु व्हिडिओ (Reels/Shorts) तयार करावे . 2. स्वच्छ भारत मिशन (SBM) अंतर्गत कंटेंट, प्लॅनिंग, शूटिंग, एडिटिंग करण्याची जबाबदारी निविदा धारकाची असेल.	Social Media	१	Per Reel	
२९	Swachh Feedback Calling	1. निविदा धारकाने स्वछ सर्वेक्षण च्या toolkit मध्ये देण्यात आलेल्या व महानगरपालिका कार्यक्षेत्रात चालणाऱ्या कामाचे अभिप्राय कॉल सेंटर मार्फत नागरिकांकडून नोंदवून घ्यावे. 2.सदर कामाचे रिपोर्टस महानगरपालिकेला सादर करावे. तसेच नागरिकांकडून आलेले अभिप्राय व महत्वाच्या सूचना संबंधीत विभागाला कळवावे .	Feedback	१	Per call	

Sr. No.	Activity Work	Description of Work	Category	Qty	Unit	Amount With GST
३०	स्वच्छ भारत अभियानाशी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच पर्यावरण विभागाचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी क्षमता बांधणी उपक्रम First Round	निविदा धारक संस्थेने 'स्वच्छ भारत मिशन' (SBM) अंतर्गत महापालिकेच्या कार्यकारी आणि तांत्रिक अधिकारी व कर्मचारी तसेच सफाई कर्मचारी यांची क्षमता विकसित करण्यासाठी, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष मार्गदर्शनाद्वारे (handholding) मुख्य आधारभूत स्रोत म्हणून काम करणे. या क्षमता बांधणीच्या उपक्रमात स्तर १, स्तर २ आणि स्तर ३ मधील कर्मचारी समाविष्ट असतील.	Capacity Building	१	Per participant Per Session	
३१	स्वच्छ भारत अभियानाशी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच पर्यावरण विभागाचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी क्षमता बांधणी उपक्रम Second Round	निविदा धारक संस्थेने 'स्वच्छ भारत मिशन' (SBM) अंतर्गत महापालिकेच्या कार्यकारी आणि तांत्रिक अधिकारी व कर्मचारी तसेच सफाई कर्मचारी यांची क्षमता विकसित करण्यासाठी, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष मार्गदर्शनाद्वारे (handholding) मुख्य आधारभूत स्रोत म्हणून काम करणे. या क्षमता बांधणीच्या उपक्रमात स्तर १, स्तर २ आणि स्तर ३ मधील कर्मचारी समाविष्ट असतील.	Capacity Building	१	Per participant Per Session	

सदरची दरपत्रके कार्यालयीन वेळेत दिनांक ०३ / १२ /२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका पर्यावरण विभागात सादर करावीत. सदरची दरपत्रके दिनांक ०४ / १२ /२०२६ रोजी दुपारी ३.०० उघडण्यात येतील.

- सदरचे दर GST व सर्व प्रचलित शासकीय करांसहित सादर करावेत.
- सदरची दरपत्रके सीलबंद लिफाफ्यात पर्यावरण विभागामध्ये सादर करणे अनिवार्य आहे.
- कोणतेही दरपत्रक नाकारण्याचा अधिकार पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.
- विहित कालावधीनंतर आलेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
- सदरच्या दरपत्रकांसोबत संस्था नोंदणी प्रमाणपत्र,GST नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड इत्यादी कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

स्वाक्षरीत/-
उपायुक्त (पर्यावरण)
पनवेल महानगरपालिका